सन २०१८-१९ करीता इको टुरिझम (राज्य) (२४०६ २२९५) योजनेंतर्गत ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प व सह्याद्री व्याघ्र प्रकल्प या निसर्ग पर्यटन स्थळाच्या विकास कामांकरिता निधी वितरण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. निसप-२०१९/प्र.क्र.७४/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०७ मार्च, २०१९

वाचा :-

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५ जानेवारी, २०१९
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१/२०१९/कोषा प्रशा-५, दि. ३१.०१.२०१९
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे क्र.कक्ष १/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.४२/भाग-३/२०२७/२०१८-१९, दि. १३.०२.२०१९ रोजीचे पत्र.
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-२/यो/ताडोबा/१०५९/१८-१९, दिनांक ०७.०२.२०१९.
५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-२/यो/सह्याद्री/१०५६/१८-१९, दिनांक ०७.०२.२०१९.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-३(क)/योजना/प्र.क्र.५(१८-१९/१०८४, दिनांक २५.०१.२०१९
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई यांचे पत्र क्र. कक्ष-२/योजना/२७६७, दिनांक १४.०१.२०१९

प्रस्तावना -:

राज्य योजनेअंतर्गत सन २०१८-१९ करीता निसर्ग पर्यटन/वन पर्यटन स्थळाचा विकास (२४०६-२२९५) या लेखाशिर्षाखाली रू. ८४००.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पीत आहे. वित्त विभागाच्या दिनांक २५.०१.२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये सन २०१८-१९ करिता ८०% च्या मर्यादेत अर्थसंकल्पीय प्रणालीवर निधी वितरीत करण्याकरिता उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

इको टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) योजनेअंतर्गत ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प व सह्याद्री व्याघ्र प्रकल्प या निसर्ग पर्यटन स्थळाचा आराखडा दिनांक ०८.१०.२०१५ ला झालेल्या महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाच्या तज्ञ समितीच्या सभेत सन २०१५-१६ ते २०१९-२० या पाच वर्षासाठी मंजूर झालेला असून, आराखडयाची एकूण किंमत अनुक्रमे रु.६०६९.८४ लक्ष व रु.६२३५.०० लक्ष आहे. त्यापैकी सन २०१८-१९ साठी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प रु.२१५.५१४ व सह्याद्री व्याघ्र प्रकल्प रु.४१.३३ लक्ष असा एकूण रु.२५६.८४४ लक्षचा चालू बाब प्रस्ताव व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी तपासला असता सदर प्रस्तावातील कार्यबाबी मंजूर आराखडयात समाविष्ट आहे. आवश्यक कार्यबाबींना सक्षम अधिकाऱ्यांनी तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी दिल्याचे प्रपत्र "ब" मध्ये नमूद केले आहे. सदर दोन्ही प्रस्तावांची शिफारस व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी केली आहे. संदर्भ क्र.३ अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

(अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रस्तावास शासन मंजूरी प्रदान करुन BDS द्वारे अनुदान उपलब्ध करुन देण्याकरीता विनंती केली आहे. त्यानुसार या कामासाठी अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय:-

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.३ अन्वये शासनास सादर केलेला प्रस्ताव तसेच वित्त विभागाच्या दिनांक २५.०१.२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना विचारात घेता प्रस्तावातंर्गत मागणी लक्षात घेऊन, राज्य योजनेअंतर्गत इको टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) या योजनेमधून अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व नागपूर व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई यांचे नियंत्रणातील खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेल्या निसर्ग पर्यटन स्थळांसाठी सन २०१८-१९ करीता सोबतच्या प्रपत्र - अ मध्ये नमुद केलेल्या कामाकरिता रु.२५६.८४४ लक्ष इतका निधी वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.:-

अ.क्र.	अमंलबजावणी अधिकारी/ नियंत्रक अधिकारी	निसर्ग पर्यटन स्थळाचे क्षेत्र	सन २०१८-१९ करीता प्रस्तावित रक्कम (रु.लाखात)
१	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वजी) पूर्व नागपूर	ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प	२१५.५१४
२	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वजी) पश्चिम मुंबई	सह्याद्री व्याघ्र प्रकल्प	४१.३३
	एकूण :-		**२५६.८४४**

उपरोक्त अनुदानाचा वापर करण्याच्या दृष्टीने (२४०६ २२९५) या लेखाशिर्षा अंतर्गत विहीत केलेल्या खालील अटी व शर्तीचे पालन करणे संबंधितावर बंधनकारक राहील.

१. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.
२. सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या सर्व कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी प्राप्त आहे याची खात्री अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन विकास), म.रा. नागपूर यांनी करुन घ्यावी.
३. वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८०, भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशाची अवहेलना होणार नाही याची सुध्दा दक्षता घ्यावी.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व नागपूर यांनी निसर्ग पर्यटन स्थळातील सदर कामांच्या अंदाजपत्रकांची पडताळणी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून करुन घ्यावी.
५. केंद्र शासन व राज्य शासनाचे निसर्ग पर्यटन धोरणाशी अनुकूल राहतील अशीच कामे कार्यान्वित करावी.

६. उपरोक्त कामे मंजूर अनुदानातून उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच सदरहू विकासाची कामे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावीत. सदरहू रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

७. सर्व कामे दर्जेदार होतील याबाबत योग्य शासन कार्यप्रणालीचा वापर केला जाईल व कोणतीही अनियमितता होणार नाही तसेच सर्व कामांच्या गुणवत्तेबाबत वेळोवेळी आवश्यकतेनुसार तपासणी करावी या सर्व बाबींची संबंधित निसर्ग पर्यटन स्थळांची जबाबदारी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व नागपूर व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई यांची राहील.

८. शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ नियम पुस्तिकेत नमुद केल्यानुसार तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ मध्ये नमूद गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती नुसार निविदा प्रक्रियेत ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.

९. सदर मंजूर कामामध्ये द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही तसेच कामात कुठलीही अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०. प्रस्तावित कामांमध्ये निसर्गपुरक असलेले साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा.

११. सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक २५.०१.२०१९ व दिनांक ३१.०१.२०१९ च्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

१२. शासन परिपत्रक क्र.वनबां-२०१९/प्र.क्र.२४/फ-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये वनविभागाकडून करण्यात येणाऱ्या कामाकरिता ई-निविदा प्रणालीचा वापर करणेबाबत दिलेल्या निर्देशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१३. सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी-२०११/प्र.क्र.१७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

उपरोक्त खर्च मागणी क्रमांक सी-७, प्रधान शिर्ष २४०६, वनीकरण व वन्यजीवन, पंचवार्षिक योजनांतर्गत, राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (०६) इको टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करिता उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक २५.०१.२०१९ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०७१९१९१४६६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2019.03.08 11:46:55 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व नागपूर
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई
६. वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर
७. मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सह्याद्री व्याघ्र राखीव कोल्हापूर
८. उपसंचालक, सह्याद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर स्थित कराड
९. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
१०. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत-३), मंत्रालय, मुंबई-३२.
११. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
१३. कार्यासन अधिकारी, फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)

“परिशिष्ट - अ”

शासन निर्णय क्र.निसप-२०१९/प्र.क्र.७४/फ-९, दिनांक ०७ मार्च, २०१९ सोबतचे परिशिष्ट-अ

निसर्ग पर्यटन स्थळ सन २०१८-१९ ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर		
अ.क्र.	**बाब निहाय कामे**	**रक्कम रु.लाखात**
A	**उपसंचालक (कोर), ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प**	
१	येणबोडी खोलीकरण करणे	१.३८२
२	फुटकीबोडी खोलीकरण करणे	१.३८२
३	आंबेबोडी खोलीकरण करणे	२.३०३
४	पिपरबोडी खोलीकरण करणे	१.९२०
५	खराडाबोर्ड खोलीकरण करणे	१.३८२
६	खोरडबोडी खालीकरण करणे	२.३०३
७	पळसगांव तलाव खोलीकरण करणे	२.३०३
८	फुकटववाहीबोडी खोलीकरण करणे	०.८४०
९	तारीचाझरा खालीकरण करणे	१.३९०
१०	बाम्हण देवीबोडी खालीकरण करणे	१.१६०
११	श्रीबोडी खालीकरण करणे	०.७८०
१२	पारनालाईनबोडी खालीकरण करणे	०.९७०
१३	नवीनबोडी खालीकरण करणे	१.१६१
१४	घोडयाचीटॉपबोडी खालीकरण करणे	०.९७०
१५	वाकडाबेडाबोडी खालीकरण करणे	०.९७०
१६	कुटी नं.२० च्या मागीलबोडी खोली करणे	१.१६०
१७	कोपणकूहीबोडी खोलीकरण करणे	०.९३०
१८	शिंदेंवाहाझोराबोडी खोलीकरण करणे	०.९३०
१९	जामूनझोराबोडी खोलीकरण करणे	१.५५०
२०	मेडोएरियाबोडी कं.नं.३४२२ खोली करण करणे	०.९३०
२१	Development of tourist facilitation & publicity material for TATR Development of signage's to be displayed on safari routes and nature trails in Core area	२.०००
	उपसंचालक (कोर) एकूण :-	**२८.७१६**
B	**उपसंचालक (बफर), ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प**	
२२	Development of Outdoor Diarama at Butterfly Garden World, Agarzari, Range Moharli	८८.०००
२३	Construction of Common Urinel & WC at Butterfly Garden World, Agazari, Range Moharli	१२.१७३
२४	Construction of Rapta with pipe at Ch.२-३००Km. in Ramdegi Beat in Khadsangi Range	१३.११०
२५	Construction of Rapta with pipe at Ch.६/६००Km. In Ramdegi Beat in Khadsangi	१३.२७६
२६	Construction of Rapta with pipe at Ch.१९/३००Km. In Ramdegi Beat in Khadsangi	१३.६५९

२७	Construction of Hume Pipe culvert (Near lsnpection Hut) at Ch.९/७६० Beat in Khadsangi	५.६८७
२८	Construction of Hume Pipe culvert (Near lspection Hut) at Ch.११/२५० Beat in Khadsangi	५.७३७
२९	Construction of Hume Pipe culvert (Near lspection Hut) at Ch.११/७६० Beat in Khadsangi	५.७५०
३०	Construction of Hume Pipe culvert (Near lspection Hut) at Ch.१२२/००० Beat in Khadsangi	५.७७०
३१	Construction of Hume Pipe culvert Comp. No.५७ Beat in Khadsangi	३.९१६
३२	Construction of Hume Pipe culvert and Rapta at Ch.१००mtr Near Ramdegi Kuti Beat in Khadsangi	६.७२०
३३	Construction of Home Stay cattages	८.०००
३४	ईरई जलाशयात सुरु असलेल्या बोटिंग प्रकल्पाकरीता देखरेख खर्च	३.०००
३५	आमरझरी येथे सुरु असलेल्या Camping Site मध्ये शालेय विद्यार्थी यांचे करीता २ दिवसीय प्रशिक्षण शिबीर आयोजीत करणेकरीता	२.०००
	उपसंचालक (बफर) एकूण :-	**१८६.७९८**
	एकंदर (A + B) :-	**२१५.५१४**
	निसर्ग पर्यटन स्थळ सन २०१८-१९ सह्याद्री व्याघ्र प्रकल्प,कोल्हापूर स्थित कराड	
१	चांदोली राष्ट्रीय उद्यातील पर्यटन व बफर झोनमध्ये गवत व हिरवा चारा निर्मितीसाठी गवत कुरण विकास झोळंबी-१	६.८९
२	चांदोली राष्ट्रीय उद्यातील पर्यटन व बफर झोनमध्ये गवत व हिरवा चारा निर्मितीसाठी गवत कुरण विकास झोळंबी-२	६.८९
३	चांदोली राष्ट्रीय उद्यातील पर्यटन व बफर झोनमध्ये गवत व हिरवा चारा निर्मितीसाठी गवत कुरण विकास झोळंबी-३	६.८९
४	चांदोली राष्ट्रीय उद्यातील पर्यटन व बफर झोनमध्ये गवत व हिरवा चारा निर्मितीसाठी गवत कुरण विकास नांदोली-१	६.८९
५	चांदोली राष्ट्रीय उद्यातील पर्यटन व बफर झोनमध्ये गवत व हिरवा चारा निर्मितीसाठी गवत कुरण विकास झोळंबी-४	५.५१
६	चांदोली राष्ट्रीय उद्यातील पर्यटन व बफर झोनमध्ये गवत व हिरवा चारा निर्मितीसाठी गवत कुरण विकास नांदोली-२	४.८२
७	चांदोली राष्ट्रीय उद्यातील पर्यटन व बफर झोनमध्ये गवत व हिरवा चारा निर्मितीसाठी गवत कुरण विकास नांदोली-३	३.४४
	एकूण :-	**४१.३३**

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2019.03.08 11:47:52 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग